


# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८३ वा ❑ शुक्रवार दि.०९ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## रेल्वे स्थानकावरील ध्वनी प्रदूषण एक गंभीर समस्या

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

रेल्वे स्थानकांवरील ध्वनी प्रदूषण ही एक गंभीर आणि चिंताजनक समस्या आहे, जी प्रवाशांच्या आणि जवळपास राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर (झोपेचा त्रास, ताण, ऐकण्याच्या समस्या) आणि जीवनमानावर नकारात्मक परिणाम करते आणि त्यासाठी आवाज कमी करणे, वाहनांची चांगली देखभाल आणि नियमांची कठोर अंमलबजावणी करणे यासारख्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. भारतीय रेल्वे स्थानकांवरील ध्वनीची पातळी अनेकदा परवानगी असलेल्या मर्यादेपेक्षा खूपच जास्त असल्याचे आढळून आले आहे, ज्यामुळे चिंता वाढत आहे.

रेल्वे इंजिन, हॉर्न आणि रुळांवर चाकांचा घास यामुळे तीव्र आवाज निर्माण होतो.रेल्वे स्थानकांवरील जाहिराती आणि घोषणांमुळे मोठा ध्वनिप्रदूषण होतो, ज्यामुळे प्रवाशांना त्रास होतो.प्लॅटफॉर्म आणि फ्युटओव्हर ब्रीजवरील मोठे स्पीकर्स आणि जुन्या हॉर्नमुळे मोठा आवाज होतो, ज्यामुळे ध्वनी प्रदूषण होते.

लाऊडस्पीकरवरून मोठ्या आवाजात होणारे घोषणा ध्वनी प्रदूषण वाढण्यास कारणीभूत ठरतात. डिझेल इंजिन आणि मालगाड्या, विशेषतः दाट लोकवस्ती असलेल्या भागात, आवाज वाढवतात. शिवाय प्रत्येक रेल्वे स्टेशन आजकाल जाहिराती मोठ्या आवाजात लावल्या जात असताना कानठल्या बसतात.प्रत्येक मिनिटाला जाहिराती मोठ मोठ्या आवाजात लावल्या जात असल्याने प्रवाशांना संवाद करणे अशक्य होतो.. प्रवाशी स्वस्थ देखील बोलूशकत नाही.इतक ध्वनिप्रदूषण प्रत्येक स्टेशन वर आहे.ध्वनिप्रदूषणामुळे प्रवाशांना आणि स्थानकांवरील कर्मचाऱ्यांना त्रास होतो, ज्यामुळे एकाग्रता कमी होते आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

ध्वनी प्रदूषण व वायू प्रदूषण व जल प्रदूषण होऊ नये म्हणून शासन प्रयत्नशील असताना आणि यावर करोडो रुपये खर्च केले जात असताना देखील प्रदूषण रोखण्यास अपयश येत . आहे.प्रमुख रेल्वे स्थानकांवरील पर्यावरणीय मापदंडांची निकृष्ट दर्जा, विशेषतः आवाजाची पातळी, ही चिंतेची बाब आहे.गेल्या दोन वर्षांत निवडक केंद्रीय आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या संयुक्त तपासणीतून असे दिसून आले आहे की सीपीसीबीने सामान्यतः विविध वैधानिक नियमांचे पालन केले नाही.

ही स्थानके जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाद्वारे नियंत्रित केली जातात; हवा (वायू प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९८१ आणि पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत आवश्यक मान्यता मिळवण्यात आली होती.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने () प्रमुख रेल्वे स्थानकांवर हवा, पाणी आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने आधुनिक पर्यावरण व्यवस्थापन योजना तयार करावी असा आग्रह धरला.

राज्यातील वर्ग-१ स्थानकांवर पर्यावरणीय परिस्थिती सुधारण्यासाठी तसेच राज्यातील नागरिकांच्या हितासाठी सीपीसीबीने रेल्वे सरकार/चालक आणि स्थानिक जनता यांचा समावेश असलेली एक संयुक्त समिती स्थापन केली आहे.

हे रेल्वे मंत्रालय (रेल्वे मंत्रालय) आणि गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालय (गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालय) या सर्वोच्च संस्थांचा समावेश असलेल्या सीपीसीबीने अलीकडेच आयोजित केलेल्या उच्चस्तरीय बैठकीचे समानार्थी आहे. रेल्वेने सीपीसीबीला रेल्वे स्थानकांच्या आधारावर पर्यावरण मसुद्यासाठी विविध घटक/मानकांचे वजन निश्चित करण्याची विनंती केली आहे, ज्याची सध्याची कामगिरी सीपीसीबीद्वारे पुनरावलोकनाच्या अधीन आहे.

तथापि, सीपीसीबीने भारतातील मूल्यांकनासाठी निवडलेल्या ७२० स्थानकांवर हवा, पाणी आणि ध्वनी प्रदूषणाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी एक आधुनिक पर्यावरणीय योजना विकसित केली आहे.

सर्व मेट्रो स्थानकांच्या पर्यावरणीय मूल्यांकन आणि व्यवस्थापनासाठी एक स्वतंत्र ब्लूप्रिंट तयार करण्यात आली.मात्र परिस्थिती जैसे थे च आहे..या सर्व सुधारणा केवळ कागदावरच आहे.

आवाजाच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने झोपेची समस्या, श्रवणशक्ती कमी होणे, ताणतणाव आणि हृदयरोग होऊ शकतात. उच्च आवाजाची पातळी: . ने नोंदवल्याप्रमाणे, स्थानकांवर आवाजाची पातळी अनेकदा ७०-११० डेसिबलपर्यंत पोहोचते, जी परवानगी असलेल्या मर्यादेपेक्षा (५५-६५ डीबी) जास्त असते.रेल्वेस्टेशन होणारे ध्वनी प्रदूषण हा गंभीर चिंतनाचा विषय असून रेल्वे विभागाने या समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे व प्रवाशांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. सुरक्षित रेल्वे प्रवास हा जनतेचा अर्थात प्रवाशांचा मूलभूत अधिकार आहे.या पार्श्वभूमीवर रेल्वेने पर्यावरणीय कायद्यांचे पालन केले पाहिजे आणि नागरी अधिकाऱ्यांशी समन्वय साधून काम केले पाहिजे.

# गोव्यातील मराठी साहित्यिकांनी स्वतःच्या जिद्दीवर आणि स्वखर्चावर संस्कृती जपली

**ज्योतिर्मय साहित्य**

**पणजी (आमोद कुलकर्णी)–** गोवा आज पर्यटनाच्या नकाशावर चमकणारा, समुद्रकिनाऱ्यांच्या सौंदर्याने मनाला भुरळ घालणारा प्रदेश. पण या झगमगाटाच्या आड एक वेगळे वास्तव शांतपणे श्वास घेत आहे; गोव्याची मराठी साहित्यपरंपरा. ही परंपरा फक्त साहित्याची नाही; संतसाहित्य, पत्रकारिता, सामाजिक जागृती, शिक्षण, सांस्कृतिक संगम आणि लोकचळवळींचा कणा म्हणून तिने इतिहासात ठसा उमटवला आहे.

तरीही आज तीच परंपरा भाषिक राजकारण, संस्थात्मक उदासीनता, नाममात्र निधी आणि प्रशासकीय दुर्लक्ष यांच्या छायेत धडपडत आहे. उपेक्षेला आता नाव देण्याची गरजच उरली नाही; ही साफसफाईने दिसणारी संस्थात्मक उपेक्षा आहे.

आजही कवी लिहितात, कथा जन्म घेतात, तरुण लेखक नवनवीन प्रयोग करतात; पण या सर्जनशील प्रवाहाला योग्य, पारदर्शक आणि टिकाऊ पाठबळ मिळत नाही. गोवा जिथे साहित्यिक विचारांचा दीपस्तंभ ठरू शकला असता, तिथेच व्यवस्थेचा दृष्टिकोन सतत संशयाने भरलेला दिसतो.

लेखक काय निर्माण करू शकतो? या प्रश्नापेक्षा 'लेखकाला कार्यक्रमात कसे सांभाळावे'? हा प्रश्न अधिक वेळा विचारला जातो; ही वृत्तीच गोव्याच्या साहित्यविश्वाची सर्वात मोठी शोकांतिका ठरते. कुठलीही कला, प्रतिभा, साहित्य, भाषा किंवा संस्कृती टिकवायची असेल, किंबहुना तिचे संवर्धन करायचे असेल, तर राजाश्रय हा अनिवार्य घटक ठरतो. आज गोव्यातील मराठी साहित्यिकांनी स्वतःच्या जिद्दीवर आणि स्वखर्चावर ही संस्कृती जपली आहे.

पण व्यवस्थेने त्यांना मिळणारा योग्य पाठबळ, अनुदान आणि धोरणात्मक आधार अजूनही मिळालेला नाही. या उपेक्षेमुळेच प्रतिभावंत लेखक आणि संशोधक संघर्ष करत आहेत, आणि साहित्य जिवंत राहण्यासाठी केवळ आपल्या श्रमावर अवलंबून आहेत.



इतिहास, लोकसंस्कृती, दस्तऐवजी संपत्ती, भाषिक संगम, शब्दकोश निर्मिती – अनेक क्षेत्रांत अभ्यासक अविरत संशोधन करत आहेत. पण संशोधनासाठी स्वतंत्र शिष्यवृत्ती नाही, प्रकल्पनिधीची शक्यता अत्यल्प, ग्रंथालयांची अवस्था दीन, आणि दस्तऐवजांचे संवर्धन अपुरे.

डिजिटल आर्काइव्हची संकल्पना अजूनही थोड्याच जिद्दी व्यक्तींच्या खांद्यावर लोंबत आहे. अशा स्थितीत ज्ञाननिर्मितीचा पाया किती काळ भक्कम राहील? संशोधन करणाऱ्यांवरच व्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी टाकली जाते आणि त्याच व्यक्तींना नंतर मान्यता देताना दुर्लक्ष केले जाते,

हा विरोधाभास गोव्याच्या प्रशासकीय दुर्बलतेचे क्रूर चित्रण आहे. डिजिटल उपक्रम, भाषावैज्ञानिक अभ्यास केंद्रे, सांस्कृतिक डेटाबेस यांसारखी कामेही व्यक्तींच्या श्रमांवर टिकून आहेत. योजना जाहीर होतात, पण अंमलबजावणीला गती नसते.

उपक्रम सुरू होतात, पण निधी अर्धवटच मिळतो. धोरणे तयार होतात, पण जबाबदारी कोणाची याचा ठावठिकाणा नसतो. परिणामी एकच प्रश्न सतत छळतो, व्यवस्था पर्यवेक्षक आहे की फक्त प्रेक्षक?

कवी-लेखकांसाठी 'अनुदान' हा शब्दच जणू गोव्यात वर्ज्य आहे. पुस्तकनिर्मिती, प्रकाशन, संशोधन, फेलोशिप, वार्षिक ग्रँट-कशासाठीही शासनाने दरवर्षी वाट पाहणाऱ्या साहित्यिकांना केवळ निराशाच मिळते.

मानधन देण्याचा प्रश्न तर लाजिरवाणा. कवी-लेखक स्वतःच्या खिशातून साहित्य जगवतात आणि हीच त्यांची स्वयंपूर्णता व्यवस्थेसाठी त्यांना दुर्लक्षित करण्याचे सोयीस्कर कारण बनते. ज्या भाषेच्या संस्कृतीतून गोवा घडला, त्या भाषेकडेच पाठ फिरवणे हे सांस्कृतिक दारिद्र्याचं चिन्ह नाही तर चेतावणी आहे. अधिकृत समर्थनाऐवजी साहित्यिक उपक्रम आज व्यक्तींच्या संघर्षामुळे टिकून आहेत. वाचनमंडळे, कविसंमेलने, व्यासपीठे, कार्यशाळा – ही सगळी चळवळ काही समर्पित मंडळींच्या जिद्दीमुळे चालते.

लढणाऱ्यांनाच स्वतःचे खिसे रिकामे करावे लागतात आणि त्याच उपक्रमांवर टीका करणारी मंडळी नंतर मंचावर उभी दिसतात, हादेखील गोव्याच्या साहित्यजगताचा कटू विनोदच.

याउलट सोशल मीडियावर उभी राहिलेली उथळ दिखाऊ 'साहित्यसंस्कृती' वेगाने वाढताना दिसते. खऱ्या साहित्यापेक्षा काढलेला 'फोटो' लेखकाला प्रसिद्ध करतो; राजकारण्यांसोबतच्या सेल्फ्या, साहित्यिकांसोबतचे फोटो, आणि परस्पर स्तुतीचा बाजार हीच जणू साहित्याची नवीन चलन प्रणाली झाली आहे.

कलाविवेक नसताना केली जाणारी परस्पर स्तुती हीच आजच्या दिखाऊ साहित्याची खरी ओळख ठरते.

याहून मोठी सावली गोव्याच्या साहित्यविश्वावर पडलेली आहे-साहित्यिक चोरीची. जुन्या कविता 'रिमिक्स' करणे, इंटरनेटवरील मजकूर जशाच्या तसा घेणे, प्रेरणाच्या नावाखाली नक्कल करणे, या प्रवृत्ती इतक्या प्रमाणात वाढल्या आहेत की मौलिकतेची ओळख हरवू लागली आहे. हे फक्त नैतिकतेचा नाही, तर साहित्याच्या मान-सन्मानाचाही गंभीर अपमान आहे. या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर नवी प्रतिभा दारात उभी आहे, पण मंचावर नाही. एक छोटा गट, त्यांची लॉबी, त्यांचे नातेवाईक-यांच्यावरच सतत प्रकाशझोत. खऱ्या गुणवत्तेची ओळख, संधी, नोंद , कशातच या नव्या प्रतिभेसाठी जागा नाही. साहित्याला 'परंपरा' आहे, पण संधी मिळवण्यासाठी 'ओळखपरंपरा' लागते, ही विकृत धारणा साहित्याला गुदमरवते.

तरीही, या उपेक्षेच्या ढिगाऱ्यात साहित्याचे नाडी-स्पंदन जिवंत आहे. गोव्याचा साहित्यिक आजही थांबलेला नाही. उपेक्षा वाढते तशी त्यांची दृढता अधिक तीव्र होते. साहित्य जिवंत आहे कारण व्यवस्थेने त्याला जपले म्हणून नाही; तर साहित्यिकांनी स्वतःच्या श्वासाने ते जिवंत ठेवले म्हणून. ही जिद्द, ही चिकाटी यातूनच गोव्याच्या मराठी साहित्याची खरी रीड उभी आहे. शेवटी, गोव्यातील मराठी साहित्याला फक्त निधी नको; त्याला सांस्कृतिक प्रामाणिकता, न्याय्य धोरणे, राजकीय निष्पक्षता आणि सर्जनशीलतेचा सन्मान हवा आहे. जोपर्यंत गुणवत्तेला प्राधान्य, संशोधनाला स्थायी निधी, साहित्यकृतींना अनुदान, आणि नव्या प्रतिभेला संधी देण्याची रचना तयार होत नाही तोपर्यंत साहित्य तग धरेल, परंतु तेजस्वी प्रकाशाने उजळणार नाही. साहित्याचा आवाज दाबता येतो, पण नष्ट होत नाही. आणि एक दिवस हा आवाज इतका घनगंभीर होईल की उपेक्षेचा संपूर्ण अंधार मागे सरकून जाईल.

( सौजन्य: दैनिक गोमंतक)

# बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स ऑर्गनायझेशन चे येत्या शनिवारी आळंदी येथे राष्ट्रीय अधिवेशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – भारतीय मजदूर संघ व नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ बँक ऑफिसर्स शी संलग्न असलेल्या ''बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स ऑर्गनायझेशन''चे २१ वे त्रैवार्षिक राष्ट्रीय अधिवेशन येत्या शनिवारी दहा जानेवारी रोजी संपन्न होत आहे.

आळंदी येथील फ्रुटवाले धर्मशाळेच्या आर एम डी सभागृहात शनिवारी सायंकाळी पाच वाजता खासदार डॉ मेघा कुलकर्णी यांचे हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून बँक ऑफ महाराष्ट्र चे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निधू सक्सेना,भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सरचिटणीस रवींद्र हिंमते,भारतीय मजदुर संघाचे राष्ट्रीय चिटणीस व वित्तीय संस्था प्रभारी गिरीश चंद्र आर्य, बोमोचे संस्थापक बाळासाहेब फडणवीस,नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ बँक ऑफिसर्स चे राष्ट्रीय सरचिटणीस के एन आदर्श ह्यांची मुख्य उपस्थिती राहणार आहे.


अधिवेशनामध्ये सध्याची बँकिंग उद्योगा समोरील आव्हाने,बँक ऑफ महाराष्ट्र मधील अधिकाऱ्यांचे ज्वलंत प्रश्न,राष्ट्रीयकृत बँकांचे होऊ घातलेले विलीनीकरण आदी विषयावर चर्चा होणार असून विविध ठराव पारित केले जाणार आहे.


अधिवेशन यशस्वितेसाठी विविध समित्या स्थापित केल्या असून ''बोमो'' चे अध्यक्ष मनीष जैन,चेअरमन डॉ सुनील देशपांडे, एम व्ही सुमित्रानंदन,कार्याध्यक्ष अश्विनी देव हे प्रयत्नशील आहेत.

ह्या अधिवेशनास संपूर्ण भारतातून म्हणजे दिल्ली, चेन्नई, उत्तर प्रदेश, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश, आंध्र, गुजराथ, ओरिसा गोवा, बिहार, आसाम, कर्नाटक, झारखंड, तेलंगणा, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर या राज्यासह महाराष्ट्र राज्यातील ''बँक ऑफ महाराष्ट्र''चे सुमारे पंधराशेचे वर अधिकारी उपस्थित राहणार असल्याचे ''बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स ऑर्गनायझेशन''चे राष्ट्रीय सरचिटणीस संतोष गदादे यांनी माहिती दिली आहे.










## जात्यावरच्या ओव्या......

देव वाट पाहतो
कधी येणार भेटाया?
प्रपंचाचा दास जीव
धीर होईना सोडाया ||४४०||

गाय गेली रानात
गोठ्यामंधी वासरू
दिस लागे मावळाया
तस लागल हंबरू ||४४१||


©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## समर्थांच्या घरी...




ज्योतिर्मय साहित्य

२२ डिसेंबर २०२४ चा दिवस ! वर्ष संपत आले होते पण या वर्षाने जाता जाता मला सुरेखशी भेट दिली. मागील जन्मी काहीतरी पुण्य केले असावे म्हणून जांब समर्थ या पुण्यभूमीला भेट देण्याचा पुण्यप्रद योग आला. याच दिवशी जालन्यामध्ये सौ. स्वाती रत्नपारखी यांच्या काव्यकस्तुरी या काव्यसंग्रहाचे प्रकाशन माझ्या उपस्थितीत झाले आणि त्यानंतर समर्थ रामदासांच्या जन्मभूमीला भेट देण्याचा योग जुळून आला. लहानपणी मनाच्या श्लोकांचे पाठांतर केले होते. लहानपणी त्यांचा फारसा अर्थ कळला नव्हता. पण मोठेपणी त्यांच्यातली सत्यता कळू लागली. पुढे यथावकाश दासबोधही थोडाफार वाचला. कधीतरी वेळ प्रसंगी समर्थ रामदासांवर थोडेफार बोलण्याचाही योग आला. जिथे समर्थांनी आपले अवतार कार्य समाप्त केले आणि जिथे त्यांचे समाधी आहे अशा सज्जनगडावर तीन वेळा जाण्याचा आणि राहण्याचा योगही आला. परंतु ज्या जांब गावी समर्थांचा जन्म झाला होता ते गाव पाहण्याची इच्छा खूप दिवसांपासून मनात होती. आणि २२ डिसेंबरला ती इच्छा पूर्ण झाली. जांब हे गाव जालना जिल्ह्यातील घनसावंगी या तालुक्यात आहे आणि जालन्यापासून अंबड मार्गे दीड तासात आपल्याला तिथे पोहोचता येते. तर संभाजीनगर येथून तिथे पोहोचण्यासाठी साधारणपणे दोन ते अडीच तास लागतात.




मी जांब येथे जाणार असल्याचे बोलणे नाशिक येथील श्री अशोककाका धर्माधिकारी यांच्यासोबत झाले होते. ते त्या ठिकाणी कामानिमित्ताने पूर्वी अनेकदा जाऊन आले होते आणि त्यांच्या शुभ हस्ते तिथे काही कार्यही घडले आहे. त्यामुळे त्यांनी मला तिथे मुक्कामाला जा. त्या ठिकाणी तुमची सोय होईल असे आवर्जून सांगितले आणि त्यांच्या सूचनेनुसार आम्ही दोघे ( मी आणि सौ ) संध्याकाळी जांब येथे पोहोचलो. जांब समर्थ हे एक छोटेसे गाव आहे. गावात शिरल्याबरोबर आपण अगदी ग्रामीण भागात आलो आहोत याची जाणीव होते. तेथील शांत, गर्दी विरहित आणि निसर्गरम्य असलेले वातावरण गेल्याबरोबर आपले मन प्रसन्न करते. दुरूनच मंदिराचा दगडी कळस आपल्याला दिसतो. जवळ पोहोचल्यानंतर मंदिराचे प्रशस्त आणि रम्य आवार आपले मन मोहून टाकते. वातावरणात एक वेगळेच पावित्र्य जाणवायला लागते आणि आपण एका अतिशय पवित्र ठिकाणी आलो आहोत याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. येथे पूर्वकल्पना देऊन गेल्यास आपली राहण्याची आणि जेवण्याची सोय संस्थानच्या वतीने होऊ शकते.

(क्रमशः)



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏


दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## चतुर्दशब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

दशक सातवा समास तिसरा

नमस्कार


अनेकदा असा अनुभव येतो की एका सारखीच दुसरी पण वस्तु आपल्याला तंतोतंत दिसते. म्हणजेच जगात अनेक वस्तु आहेत आणि त्या शोधून काढणे हा माणसाच्या ज्ञानाचा प्रधान हेतु असतो. ऊदा फळेफुले एकसारखी दिसणारी माणसे, विविध प्रकारच्या देवादिकांच्या मुर्ती की ज्या अनेक शतकं ओलांडून सुध्दा जशाच्या तशा राहिल्या आहेत. माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या आयुष्यात अशा अनेक आश्चर्यकारक गोष्टींचा आदर वाढतो व त्याचा इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा मनामध्ये निर्माण होते. प्रत्येक वस्तुवेगळेपणाने जगते. तिला स्वतःचा आकार असतो,रंगरूप असते ती कालाबरोबर बदलते. कालांतराने नाश पावते. याच्या उलट अनेक वस्तूंमधील एकपणा सर्व वस्तूंना व्यापून रहातो. त्या एकपणाला आकार नसतो, रंगरूप नसते. तो काळाबरोबर बदलत नाही. कधीही नाश पावत नाही. वस्तू मुर्त असते. तर वस्तूंना व्यापणारा एकपणा अमूर्त असतो. अनेक वस्तूंना व्यापून रहाणार्या एकपणाचे क्षेत्र विशाल करताकरता अखेर सर्व वस्तूंना एकपणाने पोटात घेणाऱ्या ब्रम्हापर्यन्त आपण पोहचतो. मानवी बुध्दीच्या भूमिकेवरून या परब्रम्हाचे वर्णन करण्यास संपूर्ण विश्वातील वस्तु शोधाव्या लागतात. तेव्हा अशा प्रकारचा विचार जेव्हा केला जातो तेव्हा चोदा प्रकारांनी ब्रम्हाचें वर्णन योग्यचं आहे. परंतु आत्मसाक्षात्कारी पुरूष मानवी बुध्दीच्या मर्यादा ओलांडून जातात. त्यांच्या द्रुष्टीने ही चौदा लक्षणे पूर्णब्रम्हाचे वर्णन करण्यासाठी कमी पडतात.ह्या सर्वाचे यथोचित ऊत्तर यासमासात आपल्याला समर्थ देतात म्हणून हा समास तर्क, शुध्दज्ञान, अफाट बुध्दीमत्तेचे दर्शन घडवते. ते कसे हे आपण १ते ५३ व्या ओवीपर्यन्त शब्दरूपात मांडण्याचा अल्पसा प्रयत्न करणार आहे. समर्थाचे आशिर्वाद व वाचकांच्या प्रेमामुळे हे शक्य होणार आहे काही चुकले तर समर्थ क्षमा करतील याची खात्री आहे.

जय जय रघुवीर समर्थ

श्री गुरूदेवदत्तात्रेया नमो नमः

१) पूर्वपक्ष-एखादा विषय तर्काने समजावून द्यायचा असतो त्यावेळी त्या विषयावरील जे आक्षेप असतात त्याचे प्रथम वर्णन करतात. त्यालाच पूर्वपक्ष असे म्हणतात.**(क्रमशः)**

## परमेश्वराची खरी पूजा


श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ' मी साधन करतो ' असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे. चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूतीं भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे.

भक्ती आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, आणि विषयाची अनासक्ती म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ' रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमयच आहेत. ' सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ' रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. ' असे आपण मन:पूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल.

' माझ्या देवाला हे आवडेल का ? ' अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे नि:संशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.




अभंग ५

नवल देखिलें कृष्णरुपीं बिंब ।
सांवळी स्वयंभ मूर्ति हरिची ॥१॥
मन निवालें बिंबलें समाधान जालें ।
कृष्णरुपें बोधलें मन माझें ॥ध्रु०॥ बापरखुमादेविवरु
सांवळा सर्व घटीं ।
चित्तें चैतन्या मिठी घालिताखेवों ॥२॥

अर्थ:-
त्या सावळ्या कृष्णाची स्वयंभु मूर्ती मी पाहिली व मला त्याचे नवल वाटले. त्या कृष्णरुपाच्या बोधामुळे माझे समाधान झाले व मन शांत झाले. तो रखुमाईचा पती व माझे पिता सर्वांमध्ये चैतन्यरुपाने असुन त्याला मी मिठीत कवळुन घेत आहे. असे माऊली सांगतात.

अभंग ६

सुंदर सुरेख वोतिलें ।
परब्रह्म तेज फ़ांकलें ।
तें व्योमीं व्योम सामावलें ।
नयनीं वो माय ॥१॥
कमळनयन सुमन फ़ांकलें ।
त्या परिमळा आथिलें ।
मकरंदीं वो माय ॥ध्रु०॥
संकोचला संसार ।
पारुषला व्यवहार ।
ब्रह्मानंद अपार ।
जहाला वो माय ॥२॥
मधुर वेदवाणी ।
न पवे ज्याच्या गुणीं ।
तें ठकावलें निर्वाणीं ।
नेति मुखें वो माय ॥३॥
यापरतें बोलणें ।
न बोलणें होणें ।
तें म्यां आपुल्या अंगवणें ।
केलें वो माय ॥४॥
ऐसियाते वोटी ।
लागलें तयाचे पाठी ।
रखुमादेविवरा भेटी ।
विठ्ठलीं वो माय ॥५॥

अर्थ:-
नितांत सुंदर अश्या त्याचे तेज परब्रह्म स्वरुपानी पसरले आहे. ते व्योम म्हणजे आकाशा येवढे आकाशभर व्यापले आहे. कमळा सारखे नेत्र व फुला सारखा सुगंध त्याला आहे. त्याचा तो परिमळ व मध ह्यांचा तो एकत्रीत अविष्कार आहे. त्याच्या ठायी संसार संकोचतो, व्यवहार दुर जातो व त्याच्या जवळ फक्त अपार ब्रह्मानंद मिळतो. मधुर वेदवाणी त्याच्या गुणांचे आकलन करु शकत नाही व नेती म्हणत तेथेच विरामते. या बाबत बोलणे हे न बोलणेच होऊन जाते कारण तो ब्रह्मस्वरुपपणे मीच आहे. हे दोन्ही ओठ त्याचे स्मरण करत त्याच्या जणु काही पाठी लागले आहे. तो रखुमाईचा वर विठ्ठलाची मला भेट व्हावी अशी माऊली इच्छा करतात.




## हिवाळ्यात काय खावे व काय खाऊ नये

ज्योतिर्मय साहित्य

हिवाळ्यात निरोगी आणि उत्साही राहण्यासाठी आहारात योग्य बदल करणे खूप महत्त्वाचे आहे. थंडीत शरीराला उष्णता आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या पदार्थांची जास्त गरज असते. येथे काय खावे आणि काय खाऊ नये याची माहिती दिली आहे:

हिवाळ्यात काय खावे

हिवाळ्यात शरीराला आतून उबदार ठेवणारे आणि पोषण देणारे पदार्थ खावेत.

उष्णता देणारे पदार्थ:

गूळ: साखरेऐवजी गुळाचा वापर करा. गूळ शरीराला उष्णता आणि खनिजे देतो.

तीळ (पांढरे आणि काळे): तिळाचे लाडू किंवा तिळाची चिक्की खावी. तीळ ऊर्जा आणि प्रथिने देतात.

शेंगदाणे, बदाम, मनुके, खजूर: हे ड्रायफ्रुट्स आणि नट्स शरीराला ऊर्जा, उष्णता आणि ताकद देतात. सकाळी तूप-गूळ किंवा खजूर खाणे फायदेशीर आहे.

तूप, लोणी: हे स्निग्ध पदार्थ आहारात जरूर असावेत.

धान्ये आणि कडधान्ये:

बाजरी आणि नाचणी: या धान्यांची भाकरी शरीराला उष्णता देते.

शेंगदाणे आणि जवस : यांचा आहारात समावेश करा.

भाज्या आणि फळे:

हंगामी भाज्या: गाजर, मटार, पालक, मेथी, कारले यांसारख्या भाज्यांमध्ये जीवनसत्त्वे आणि लोह भरपूर प्रमाणात असते.

डाळिंब: हे हिवाळ्यात फायदेशीर आहे.

रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे:

आले (अदरक) आणि सुंठ (सुके आले): आल्याचा चहा, डाळी आणि भाज्यांमध्ये आल्याचा वापर करा. सुंठ पावडर (गूळ आणि तुपासोबत) थंडीशी लढण्यासाठी उत्तम आहे.

हळद: हळद आणि आल्याचे दूध पिणे फायदेशीर ठरते.

काढा: आले, लवंग, दालचिनी, काळी मिरी, वेलची आणि तुळस घालून केलेला काढा रोगप्रतिकारशक्ती वाढवतो.*

दही/ताक आणि आंबवलेल्या भाज्या (): (जसे की किमची) हे प्रोबायोटिक्सचे उत्कृष्ट स्रोत आहेत, जे पचन आणि रोगप्रतिकारशक्ती सुधारतात.

गरम सूप: भाज्यांचे गरम सूप, टोमॅटो सूप किंवा डाळीचे सूप शरीराला प्रथिने आणि उब देतात.

कोमट पाणी किंवा हर्बल टी:*
यामुळे पचन चांगले राहते आणि शरीर हायड्रेटेड राहते.

हिवाळ्यात काय खाऊ नये ( )*

काही पदार्थ थंडीत शरीरासाठी योग्य नसतात आणि सर्दी-खोकल्याचा त्रास वाढवू शकतात.

जास्त थंड पदार्थ आणि पेये:*

आईस्क्रीम आणि कोल्ड्रिंक्स: कडाक्याच्या थंडीत थंड पेये पिणे किंवा आईस्क्रीम खाणे शरीरासाठी योग्य नाही. यामुळे घसा चिघळू शकतो आणि सर्दी-खोकला वाढू शकतो.

थंड दही आणि थंड दूध: हे पदार्थ टाळावेत, कारण ते सर्दी वाढवू शकतात. कोमट दुधाचे सेवन करा.

पचायला जड आणि तेलकट पदार्थ:

तळलेले पदार्थ भजी, समोसा, वडापाव यांसारखे तळलेले आणि जास्त तेलकट पदार्थ पचायला जड असतात. यामुळे पोटात जळजळ, अपचन आणि वजन वाढू शकते.

**(क्रमशः)**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

### ♦लालसेपायी जीव गेला♦

*जय आणि विजय यांच्यात घनिष्ट मैत्री होती. दोघेही पट्टीचे पोहणारे होते. नदीच्या पाण्यात भरपूर मस्ती केली. तितक्यात स्थानिक प्रशासनाकडून बंधा-याकडून पाणी सोडण्यात येत असल्याची सूचना देण्यात आली. त्यामुळे दोघेही नदीच्या बाहेर आले. जेव्हा बंधा-यातील पाणी सोडण्यात आले तेव्हा नदीला पूर आल्यासारखी स्थिती निर्माण झाली. जय आणि विजय सुरक्षित स्थळी थांबले होते. नदीच्या पाण्याचा ओघ पाहत असतानाच नदीच्या प्रवाहात एक घोंगडी तरंगत येत असल्याचे दोघांच्याही दृष्टीस पडतील. विजयला ती घोंगडी ओढून आणावीशी वाटली. जयने त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु विजयने तोपर्यंत पाण्यात उडी मारली होती. तो घोंगडीजवळ गेला आणि तिला ओढत असतानाच त्याचे संतुलन बिघडले. विजय जितका जोम लावून किना-यावर येण्याचा प्रयत्न करत असतानाच पाण्यात उठणा-या लाटा त्याला दूर लोटत असत. मित्र असा संकटात सापडलेला पाहून जय ओरडला,"अरे मित्रा, घोंगडी सोड आणि परत निघून ये" पण विजय म्हणाला," अरे जय मी घोंगडी सोडण्याचा खूप प्रयत्न करतो आहे पण घोंगडीनेच मला धरून ठेवले आहे." जयला कळून चुकले की विजयला त्या घोंगडीची लालसा निर्माण झाली आहे. विजयने घोंगडीसह किना-यावर येण्याचा खूप प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला. शेवटी तो पाण्यात मृत्युमुखी म्हणतात.*

*तात्पर्य- कोणत्याही प्रकारची लालसा प्रसंगी आपल्या जीवाशी खेळू शकते.*

# नातं ( भाग ०१ )

**ज्योतिर्मय साहित्य**

आनंद मोठ्या कंपनीमध्ये जनरल मॅनेजर होता. ३६ वर्ष नौकरी झाल्यामुळे जवळ पैसा, घर दार, गाडी, बंगले यांची कमी नव्हती. घरात सर्व सुखसोयी होत्या.

आनंदची दोन्ही मुले अमेरिकेत मोठ्या मोठ्या कंपन्यामध्ये मोठ्या पदावर कार्यरत होती. तसेच ती आपल्या संसारात ही मग्न होती.

आनंद वयाची साठी जवळ आली तरी मागच्या महिन्यापासून ऑफिस मध्ये १५-१६ घंटे कार्यरत राहत असे.

याच कारण एकच दुःख मनात होतं, ते म्हणजे घरी दुसरी कुणीच नव्हते. त्यामुळे आपल्या ज्ञानाचा फायदा कंपनीसाठी व्हावा म्हणून जास्त वेळ तेथे देत होता.

आज मात्र आनंद घरी लवकरच निघाला. त्याचे कारण म्हणजे मधुरा असताना, त्या उभयतांनी एकमेकांना वचन दिले होते की कुणी आधी गेले तरी त्याने/तिने दुसऱ्याचा वाढदिवस तो/ती जिवंत असेपर्यंत साध्या पद्धतीने घरच्या घरी आठवण म्हणून साजरा करायचा.

म्हणुन आनंदने घरी जाताना रस्त्यात एके ठिकाणी कार पार्क करून मंडई मधून छान असा फुलांचा हार, स्वीट मार्ट मधून छोटासा केक घेतला. घरी पोहचेपर्यंत सात वाजत आले होते.



आनंद घरी आला. लॉक उघडले. तेवढ्यात घड्याळात सातचे टोल पडत होते. आणि इतक्यात त्याच्या कानी शब्द पडले, आनंद आलास? किती थकलास रे? आधी फ्रेश हो, मी छान, असा चहा करते. तो मधुर आवाज अर्थातच त्याची प्रिय पत्नी मधुराचा होता.

आनंद एकदम चमकला, थोडा दचकला, त्याने लाईटचे बटन ऑन केले, टीव्ही वरील भिंतींवर टांगलेल्या फोटोतील मधुरा त्याच्याकडे बघून त्याला बोलत असावी, असा त्याला भास झाला होता. हळूहळू त्याने स्वतःला सावरले, आणलेला हार, केक टिपॉय वर ठेवून वॉशरूम कडे गेला. हात पाय धुवून बाहेर आल्यावर कपडे बदलले, आणि मधुराला आवडणारा छान आकाशी निळ्या रंगाचा ड्रेस परिधान करून आधी देवघराजवळ गेला.



गिरीश खं. वसेकर, पुणे
94226 59400

तेथे लाईट लावला, समई लावली. देवाच्या पाया पडला. मग बाहेर आला, मधुराचा भिंतीवरील फोटो खाली घेऊन त्यावर आणलेला छान असा हार घातला, जवळ असलेले टेप रेकॉर्ड काढून जवळ ठेवला. केक कापण्यासाठी सुरी आणली. तेथेच मेणबत्ती लावली. टेपरेकॉर्ड वर जुनी रेकॉर्ड केलेली हॅपी बर्थडे टू यू ची धून लावली, आणि केक कापला.

आणि अचानक मधुरा मी एकटा पडलो गं म्हणून ओक्साबोक्सी रडायला लागला.

इतक्यात दारावरची बेल वाजली, आणि मधुराची अत्यंत लाडकी व जवळची मैत्रीण अर्चना तेथे आली. ती घरात आली तिने मधुराच्या फोटोला नमस्कार करून हॅपी बर्थ डे टू यू डिअर म्हणाली आणि तिच्याही अश्रूंचा बांध फुटला. ती ही घरी एकटीच होती. तिची एकुलत्या एका मुलीचे लग्न होऊन ती परदेशी स्थायिक झाली होती.

मधुरा आणि अर्चनाचा पती अंकुश, हे दोघे एका कंपनी मध्ये कामाला होती, त्या कंपनीच्या बसचा मागच्या महिन्यात अपघात झाला होता.

त्यात दोन व्यक्ती मरण पावल्या होत्या. एक म्हणजे मधुरा आणि दुसरी व्यक्ती म्हणजे अंकुश.

इतक्यात आनंद सावरला, त्याने अर्चनाला ही सावर म्हणून विनंती केली.


पण तिचे हुंदके थांबत नव्हते. नकळत त्याचा हात तिच्या पाठीवर पडला, आणि हुंदके देत ती त्याच्या गळ्यात. (क्रमशः)

# आठवणींच कपाट

**ज्योतिर्मय साहित्य**

माझ्या मनाच्या आत मी एक खोली बनवून घेतली आहे. खोलीची रचना जरा वेगळी आहे, तिचा दरवाजा फक्त आतल्या बाजूलाच उघडतो. नाही खिडकी मी ठेवलीच नाही मुद्दाम, कोणीही उगाचच डोकवायला नको म्हणून. खोलीत मी इतर सामान काही ठेवलेले नाही, ज्या आवश्यक गोष्टी म्हणजे एक आरामखुर्ची, पिण्याचे पाणी, पंखा, आणि भरपूर उजेड बास अजुन काही नाही. नाही कसं एक महत्वाचं सांगायचं राहून गेलं, एक विविध आकाराचे कप्पे असंलेलं बाहेरून काच लावलेलं कपाट आहे. किल्ली मात्र सोबत घेऊनच फिरतो, उगिच कोणाच्या हाती नको लागायला.


कपाट म्हंटल्यावर तुमच्या भुवया उंचावल्या असतील, किंवा कुत्सित हास्य आलं असेल चेहऱ्यावर. कारण कपाट म्हणजे काय असणार आहे वेगळं, कपाटासारखं कपाट एवढं काय त्याचं कौतुक असे तुमच्या नजरेतले भाव दिसताहेत मला, लपवायचा



प्रयत्न करू नका.

तर मंडळी तुम्हाला वाटतं आहे तस हे साधसुधं कपाट नाही आहे, हे आहे आठवणींच कपाट. ह्या कपाटाचं वैशिष्ट्य म्हणजे ह्यात फक्त इनकमिंग आहे पण आऊटगोईंग नाही आहे. हे कपाट निट आवरून ठेवलेलं असतं, आता कोण आवरतं म्हणून काय विचारता मीच आवरतो. एखाद्या लायब्ररीत पुस्तकं कशी निट व्यवस्थितपणे त्याच्यावर लेबल लावलेलं असतं, किंवा पुर्वी कॅसेट्स ठेवलेल्या असायच्या त्याप्रमाणे वेगवेगळ्या आठवणी मी त्या कपाटात ठेवलेल्या आहेत. अगदी लहानपणापासून ते आत्तापर्यंत. कडू-गोड, हसवणाऱ्या-रडवणाऱ्या, प्रेरणादायी, स्फूर्तिदायी, बोध घेण्यासारख्या, टोचणाऱ्या, ठसठसणाऱ्या अशा विविध प्रकारच्या विविध प्रसंगी घडलेल्या घटनांच्या आठवणी अगदी व्यवस्थितपणे सांभाळून कपाटात ठेवल्या आहेत. मला आहे छंद अशा गोष्टी जपुन ठेवायचा, छंद कसला व्यसनच म्हणा नं.

अधुनमधुन कधी लहर आली की येतो मी माझ्या त्या खोलीत फेरफटका मारून. तिथल्या आरामखुर्चीत बसून त्या कपाटाकडे पहात बसतो. तिथल्या मखमली कपड्यात गुंडाळून ठेवलेल्या आठवणींवरून हात फिरवतो, त्यांच्याशी बोलतो एखादी आठवण शेल्फवरून ऊडी मारून येते आणि बसते माझ्यासोबत. कुठल्या दिवशी कोणाचा नंबर लागेल काही सांगता येत नाही. काळवेळेचे काही बंधन नसतं, केव्हाही जायचं, जी आठवण त्या दिवशी आली असेल वाट्याला तिच्यासोबत बसायचं. किती वेळ बसायचं ह्याचं काही गणित नाही आहे, छोटी मोठी जशी असेल त्यावर ते अवलंबुन असतं. काही वेळा पटकन उठून येतो काही वेळा लागतो जास्त वेळ. आता इतक्या वर्षांच्या सहवासामुळे सौभाग्यवतीला देखिल हे माहित झालेले आहे, मी त्या खोलीत असताना मला अजिबात डिस्टर्ब करत नाही. बाहेर आल्यानंतर माझ्या चेहऱ्याकडे बघून तिला अंदाज येतो की आज कुठल्या प्रकारची आठवण आली असेल भेटीला. मुद्दाम खवचटपणे विचारते आज कोण आलं होतं भेटायला? माझ्या उत्तराची वाट न पाहता ती मला आवडतो तसा आलं घातलेला चहा करायला गेलेली असते.



शेखर देशपांडे
छत्रपती संभाजीनगर

# ९९ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलनामध्ये रंजना सानप यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा : येथे भरलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना मध्ये रंजना सानप लिखित

''चिमुकल्यांच्या मनातलं'' या बाल काव्यसंग्रहाचे प्रकाशन सन्माननीय शिरीष चिटणीस कार्यवाह (महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे), प्रकाशक, पत्रकार, लेखक, कवी जयंत लंगडे सर, सुप्रसिद्ध साहित्यिक बी.आर. माडगूळकर, कथाकार प्रा. रवींद्र कोकरे सर चपराक प्रकाशन (पुणे) प्रकाशक घनश्याम पाटील, सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सविता मोहिते, प्रसिद्ध कवी सचिन तारे, चिरंजीव आदर्श सानप यांच्या हस्ते झाले. यापूर्वी रंजना सानप याची सहा पुस्तके प्रकाशित आहेत. विविध वर्तमानपत्र दिवाळी अंक यातूनही त्यांनी विपुल लेखन केले आहे त्यांच्या लेखन कृतीसाठी त्यांना अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. या पुस्तक प्रकाशन बद्दल त्यांना विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# साहित्योत्सव संपर्क कार्यालयाचे आज उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - साहित्य भारतीच्या वतीने छत्रपती संभाजीनगरात येत्या २१ आणि २२ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य साहित्योत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या साहित्योत्सवासाठीच्या संपर्क कार्यालयाचे उद्धाटन शुक्रवारी, ९ जानेवारी रोजी शारदा मंदिर प्रशाला कक्षात होणार आहे. स. भु. शिक्षण संस्था या साहित्योत्सवाची सहयोगी संस्था आहे.


दुपारी १.०० वाजता ज्येष्ठ विचारवंत ज्ञानप्रकाश मोदाणी यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. या वेळी साहित्यप्रेमींनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन या उपक्रमाचे निमंत्रक प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, कार्यवाह इंजि. अनिरुद्ध नाईक, साहित्य भारतीचे प्रांताध्यक्ष प्राचार्य संजीव गिरासे, कार्यवाह उमेश काळे यांनी केले आहे.










# शिक्षण आणि ज्ञान

**ज्योतिर्मय साहित्य**

तब्बल ३४ वर्षानंतर भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण बदलण्यात आले. तसे पाहिले तर ३४ वर्ष म्हणजे फार मोठा काळ आहे.या काळात जीवन जगण्याच्या पद्धती राहणीमान परंपरा सणउत्सव साजरे करण्याच्या पद्धती यात अमुलाग्र बदल घडून आलेले आपणाला दिसून येईल आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाने जग मुठीत आले आहे भविष्यातील अचाट अद्भुत बदलांसाठी प्रत्येक बालक तयार असले पाहिजे त्याने स्वतः शिकले पाहिजे त्यासाठी २०२० साली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारण्यात आले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार भारत देशातील सर्व बालकांना सण २०२६-२७ पर्यंत प्राथमिक स्तरावर पायाभूत साक्षरता आणि संख्यात्मक कौशल्य प्राप्त झाली पाहिजेत. हे ध्येय निश्चित करण्यात आले आहे यासाठी केंद्र सरकारकडून निपुण भारत राज्य सरकारकडून निपुण महाराष्ट्र यासारखी अभियाने राबविली जात आहेत . राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मुलांना केवळ साक्षर बनवणे एवढाच हेतू नसून त्यांना जीवन जगण्यासाठी सक्षम बनवण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. बालकांचा व्यक्तिगत, सामाजिक, शैक्षणिक, भावनिक, कौशल्याधिष्ठित असा सर्वांगीण विकास करण्यावर भर देण्यात आलेला आहे. शिक्षण हे केवळ शिकण्यापुरते मर्यादित न राहता ते ज्ञान मिळवण्याचे प्रमुख स्तोत्र आहे हे लक्षात घेतले पाहिजे. प्रत्यक्ष अनुभवातून निरीक्षणातून स्वअभ्यासातून मिळविलेली समज प्राप्त केलेले कौशल्य, समस्येच्या निराकारणातून जाणलेली तथ्ये यास ज्ञान म्हणता येईल. शिक्षण प्रक्रियेत नवनवीन अध्ययन अध्यापन पद्धतीचा वापर होऊ लागला आहे. आनंददायी शिक्षण, ज्ञानरचनावादावर आधारित शिक्षण, बिन भिंतीची शाळा या नवनवीन चौकटी बाहेरच्या ठरलेल्या चाकोरी मोडून नविन शिक्षण पद्धतींचा नविन मार्ग निर्माण करून शिक्षक स्वतःची कल्पकता व कष्ट यांची सांगड घालून मुलांना शिकवीत आहेत. प्रत्येक मूल शिकू शकते नव्हे ते शिकतेच हे जाणून बालकांच्या मन बुद्धी शरीर यांच्यात संतुलित सुसंवाद साधणारे जीवनकेंद्री शिक्षण असले पाहिजे. प्रत्येक बालक स्वतः शिकले पाहिजे. शिकण्याच्या प्रक्रियेत ते स्वावलंबी असले पाहिजे म्हणजे कोणत्याही समस्येचे निराकरण त्याने स्वतःच्या प्रयत्नाने निरीक्षणाने केले पाहिजे व त्यातून मिळणारे यश अपयश पचविले




पाहिजे त्यातून त्याची चिकित्सक, सर्जनशील, विचार प्रवर्तक दृष्टी निर्माण झाली पाहिजे असे होईल तेव्हाच प्रत्येक बालक एक गुणवत्तापूर्ण उत्तम आदर्श नागरिक बनेल. तेव्हाच आपला देश आदर्श महासत्ता बनेल हे निश्चित समजावे.

यश आणि अपयश या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत अजून चांगले सर्वोत्तम ज्ञान प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत त्याचबरोबर त्यांनी अपयशाने खचून जाऊ नये म्हणून मी ही काहीतरी करू शकतो, माझा समाज माझा देश हे काहीतरी करू


प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230

शकतात हा अतुल्य विश्वास त्यांच्या मनात रुजवला पाहिजे त्यांना अपयशाचे भय न वाटता त्यांना पुन्हा प्रयत्न करण्यासाठी सज्ज करणारे शिक्षण असले पाहिजे. शिक्षण प्रक्रियेतून प्राप्त ज्ञानाचा वापर कसा करावा हे प्रत्येक विद्यार्थ्यास कळले पाहिजे. केवळ ज्ञानवंत, गुणवंत न होता शिलवंत होणेही तेवढेच महत्त्वाचे आहेत बुद्धी आणि शरीर यांच्याबरोबरच आत्म्याचा विकास होणेही तेवढेच गरजेचे आहे. प्राचीन काळापासून भारतीय शिक्षण पद्धतीत अध्यात्मिक शिक्षणालाही अनन्य साधारण महत्त्व देण्यात आले आहे. महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, विनोबा भावे, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर या व यांच्यासारख्या इतर विचारवंतांनी केवळ पुस्तकी ज्ञान मिळवण्यासाठी शिक्षण न घेता नवसमाज नवयुग नवराष्ट्र निर्मितीसाठी शिक्षण घेतले पाहिजे असे सांगितले आहे. माणसांनी माणसांना माणसांच्या उज्वल भवितव्यासाठी दिलेले अध्ययन अनुभव म्हणजे शिक्षण होय.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अध्ययन निष्पत्तींना खूप महत्त्व देण्यात आले आहेत बालकांच्या ज्ञानात्मक, कलात्मक, संवेदनात्मक, कौशल्यात्मक क्षेत्रांचा विचार करण्यात आला आहे. अध्ययन निष्पत्तींची विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी, व्यवहारी जीवनाशी, सामाजिक जीवनाशी सांगड घालण्यात आलेली आहे बालकांनी मूलभूत संकल्पनेचे आकलन आणि ज्ञान प्राप्त करावे यासाठी अध्ययन निष्पत्तीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे दरवर्षी कितीतरी मुले कितीतरी परीक्षा देऊन वास्तव जगात व्यवहारी दुनियेत प्रवेश करतात त्यापैकी कधी कधी साधारण गुण मिळवणारा विद्यार्थी उंच यशाचे शिखर गाठतो तर परीक्षेत अव्वल असणारा टॉपर असणारा विद्यार्थी निराशेच्या गर्दीत अडकतो हे कशामुळे घडतं? शिक्षण, मूल्यमापन प्रक्रिया, साधनतंत्रे हे सर्व सारखेच असले तरीही दोघांमध्ये ही तफावत का दिसून येते. याला कारण आहे त्यांच्या ज्ञान प्राप्तीत असलेली तफावत परीक्षा केवळ मर्यादित पाठ्यक्रमाचे मूल्यमापन करून त्याचे मेरिट लावत असते. परीक्षेत कमी गुण मिळाल्याने कित्येक विद्यार्थी दडपणाखाली दबावाखाली आपली जीवन यात्रा संपवतात. हे कुठेतरी थांबले पाहिजे परीक्षेला वेगवेगळे पर्याय शोधले जात आहेत राष्ट्रीय संपादणूक परीक्षा व राज्य संपादणूक परीक्षा या सारख्या परीक्षा मधून विद्यार्थांच्या सर्वांगिण बुद्धिमत्तेचे मूल्यांकन केले जाते हि पद्धती खुपच छान आहे यासारख्या मुल्यमापन पद्धतींचा अंतर्भाव शिक्षण पद्धतीत होत आहे त्यात अजून सुधारणा झाली पाहिजे केवळ शिक्षणार्थी मुले न घडविता ज्ञानार्थी मुले घडविता आली पाहिजेत आणि हीच अपेक्षा मुलांची, पालकांची, शिक्षकांची त्याचबरोबर शिक्षण विचारवंतांची सुद्धा आपल्या शिक्षण प्रणालीकडून आहे जेणे करून प्रत्येक मुलाचे भवितव्य हे सुखमय आनंदी आणि यशउत्कर्षाने भरलेले असेल तेव्हा आपल्या शिक्षण धोरणाचे ध्येय साध्य झाले असे म्हणता येईल.

धन्यवाद!

# ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिब जी: ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष आणि राज्यव्यापी सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

‘‘हिंद-दी-चादर’’ श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व ‘‘हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती’’, शीख- सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

श्री गुरु तेग बहादूर हे शीख धर्माचे ९ वे गुरू होते, त्यांना ‘‘हिंद-दी-चादर’’ म्हणून ओळखले जाते. श्री गुरु तेग बहादूर यांनी शीख धर्मात प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा, इतरांच्या सेवेला महत्त्व आणि निर्भीडपणा यांचा प्रचार केला, त्यांचे प्रवचन व भजन यांचा ‘‘गुरु ग्रंथ साहिब’’ यामध्ये देखील समावेश आहे. श्री गुरु तेग बहादूर यांनी १७ व्या शतकामध्ये तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरूद्ध आवाज उठवून धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी बलिदान देऊन भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक बळकट झाली. मुघल सम्राटांच्या विरोधात जावून भाई लकीशा बंजारा यांनी नववे गुरु तेग बहादूर यांच्या पवित्र शरीरास आपला तांडा व घर जाळून अग्नी दिला. या बाबीस भारतीय इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

श्री गुरु तेग बहादूर यांचे सन २०२५ हे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहित व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले बलिदान याचे स्मरण होण्याकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता ‘‘हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी तसेच गुरु गोविंदसिंग, गुरु-ता-गद्दी समागम समिती यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली. त्यानुषंगाने मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१३ जून २०२५ रोजी ‘‘हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी तसेच गुरु गोविंदसिंग, गुरु-ता-गद्दी समागम समितीची याबाबत बैठक आयोजित करण्यात आली.




**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

या बैठकीच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता, राज्यस्तरीय समन्वय समिती, क्षेत्रीय आयोजन समिती व विविध कार्यक्रम आयोजन व्यवस्था समिती इ. समित्या दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आल्या आहेत.

‘‘हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व ‘‘हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती’’, शीख- सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण व त्यात समाविष्ट असलेले जिल्हे :-

नांदेड छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली, बीड, नंदुरबार, धुळे, जळगाव

नागपूर वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम

नवी मुंबई मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक

‘‘हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व ‘‘हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती शीख-सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त नांदेड, नागपूर व नवी मुंबई येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता आवश्यक शिफारशी करण्यासाठी नांदेड, नागपूर व नवी मुंबई जि. ठाणे या तीन ठिकाणी क्षेत्रीय आयोजन समिती स्थापन करण्यात आली आहे.

क्षेत्रीय आयोजन समितीची कार्यकक्षा :- नवी मुंबई, जि. ठाणे या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता वेळोवेळी आढावा घेवून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे,

कार्यक्रमाच्या अनुषंगाने मार्गदर्शक समिती तसेच आयोजन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करून त्यांची वेळोवेळी आढावा बैठक घेणे व त्याची माहिती राज्यस्तरीय समितीस व अल्पसंख्याक विकास विभागास सादर करणे.

या कार्यक्रमाचे योग्य नियोजन, परिणामकारक अंमलबजावणी याकरिता आयोजन समन्वय समिती, व्हीआयपी व्यवस्थापन समिती, सभागृह व्यवस्थापन समिती, प्रशासन व्यवस्थापन समिती, मैदान व्यवस्थापन समिती, मंडप व्यवस्थापन समिती, बैठक व स्वागत व्यवस्थापन समिती, अतिथी व्यवस्थापन समिती, निवास व्यवस्थापन समिती, नाव नोंदणी व्यवस्थापन समिती, प्रदर्शनी व्यवस्थापन समिती, प्रचार व प्रसार व्यवस्थापन समिती, दक्षता व्यवस्थापन समिती, महिला सुरक्षा व्यवस्थापन समिती, आपात्कालीन व्यवस्थापन समिती, पाणीपुरवठा व्यवस्थापन समित्ती, स्वच्छता व्यवस्थापन समिती, स्वरुपा व्यवस्थापन समिती, सार्वजनिक परिवहन व्यवस्थापन समिती, जूताघर व्यवस्थापन समिती, लंगर व्यवस्थापन समिती तसेच स्थानिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यकता असलेल्या समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करणे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०१०१८५९४२७८१४ असा आहे. तरी या सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

***

# ‘इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट २०२६’ परिषदचे नवी दिल्ली येथे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबई – भारत निवडणूक आयोगाच्यावतीने २१ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत ‘इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट (आयआयसीडीईएम) २०२६’ या पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदचे आयोजन नवी दिल्लीतील भारत मंडपम, येथे करण्यात येणार आहे. ही तीन दिवसीय परिषद भारतीय आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था (आयआयआयडीईएम) मार्फत, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली जाणार आहे.

भारतामध्ये निवडणूक व्यवस्थापन आणि लोकशाही विषयावरील ही आतापर्यंतची सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय परिषद ठरणार असून, जगभरातील विविध देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांचे सुमारे १०० आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रतिनिधी, भारतातील परराष्ट्र मिशनचे अधिकारी तसेच निवडणूक क्षेत्रातील तज्ज्ञ व अभ्यासक या परिषदेत सहभागी होणार आहेत.

भारताने २०२६ या वर्षासाठी ‘इंटरनॅशनल आयडीईए’ या संस्थेच्या सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मांडलेल्या दृष्टिकोनानुसार ही परिषद आयोजित होत असून, ‘‘समावेशक, शांततापूर्ण, सक्षम आणि शाश्वत जगासाठी लोकशाही’’ ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे.


आयआयआयडीईएम चे महासंचालक राकेश वर्मा यांनी या परिषदेसंदर्भातील रूपरेषा मांडताना सांगितले की, ही परिषद निवडणूक व्यवस्थापन संस्थांमधील आंतरराष्ट्रीय सहकार्याचे व्यासपीठ ठरेल. निवडणूक प्रक्रियेत येणाऱ्या समकालीन आव्हानांवर सामूहिक चर्चा, सर्वोत्तम पद्धती व नावीन्यपूर्ण उपक्रमांची देवाणघेवाण आणि संयुक्त उपाययोजनांची निर्मिती या परिषदेत होणार आहे. यावेळी आयआयसीडीईएम २०२६ च्या अधिकृत लोगोचे अनावरणही करण्यात आले.

या परिषदेत सहभागी प्रतिनिधींना भारताची निवडणूक व्यवस्था, प्रक्रिया तसेच तंत्रज्ञानाधारित नवकल्पना यांची माहिती देण्यात येणार असून, भारतीय निवडणुका जगातील लोकशाही व्यवस्थांसाठी आदर्श ठरत असल्याचे अधोरेखित केले जाणार आहे.

परिषदेच्या कार्यक्रमात उद्घाटन सत्र, निवडणूक व्यवस्थापन संस्थांच्या प्रमुखांची विशेष बैठक, कार्यगट बैठका, ईसीआयनेट चे उद्घाटन तसेच जागतिक निवडणूक विषयांवरील आणि आंतरराष्ट्रीय मानकांवरील विविध विषयक सत्रांचा समावेश आहे.

तीन दिवसांच्या या परिषदेदरम्यान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या नेतृत्वाखाली ४० हून अधिक द्विपक्षीय बैठका विविध देशांच्या निवडणूक संस्थांच्या प्रमुखांसोबत पार पडणार आहेत.

या परिषदेत चार आयआयटी, सहा आयआयएम, १२ राष्ट्रीय विधी विद्यापीठे (एनएलयू) आणि आयआयएमसी यांसह नामांकित शैक्षणिक संस्थांचा सहभाग राहणार असून, राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली ३६ विषयक गट चर्चेत सहभागी होणार आहेत, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559